सकाळ

# आर्थिक विकासासाठी शिस्त महत्त्वाची : कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. २ : देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक साक्षरता, शिस्त आणि आर्थिक पारदर्शकता महत्त्वाची असते. आर्थिक साक्षरतेच्या मोहिमेत अर्थतज्ज्ञ, लेखकांची भूमिका महत्त्वाची आहे. विशेषतः अलीकडच्या काळात वाढत असलेली आर्थिक फसवणूक विचारात घेता नागरिकांचे आर्थिक प्रबोधन करणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी सदस्य प्रा. संजय ठिगळे यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य व लेखक-समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांना 'अर्थतरंग' हे पुस्तक भेट दिले. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. अर्थसाक्षरतेशिवाय विकास शक्य नाही. विशेषतः तरुणाईने त्यामध्ये लक्ष घालणे आवश्यक असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.

सकाळ

# 'औद्योगिक रसायनशास्त्र'च्या विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील प्लेसमेंट सेल आणि रसायनशास्त्र विभागातर्फे घेण्यात आलेल्या कॅम्पस ड्राईव्हमध्ये सात विद्यार्थ्यांची असिस्टंट केमिकल ॲनालायझरपदी निवड झाली आहे.

त्यात अनिकेत मेटकर, सायली शिंदे, प्रणव आंबी, आशुतोष हंकारे, गणेश सदाकळे (औद्योगिक रसायनशास्त्र), अतिश कांबळे आणि नंदिनी जगदाळे (सामान्य रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे.

या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सीएमएस सॉफ्टवेअर कंपनी प्रायव्हेट लिमिटेडतर्फे असिस्टंट केमिकल एनालायझर या पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्या फक्त एमएससी द्वितीय वर्ष उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच होत्या. यामध्ये औद्योगिक रसायनशास्त्र विभागाच्या पाच आणि सामान्य रसायनशास्त्र विभागातील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली.

03 JUL 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इनोव्हेशन सेल, अद्ययावत प्रयोगशाळा

## महाविद्यालयांचे संशोधन; विद्यार्थ्यांमधील स्टार्टअपला चालना

■ संतोष मिठारी :
सकाळ वृत्तसेवा

**बदलती महाविद्यालये**
भाग - ३

कोल्हापूर, ता. २ : पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमधील नवसंकल्पना, प्रयोग आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे पाऊल कोल्हापुरातील महाविद्यालयांनी टाकले आहे. त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी विद्या शाखेतील महाविद्यालयांनी इनोव्हेशन अँड स्टार्टअप सेल, इन्क्युबेशन सेंटर, अद्ययावत प्रयोगशाळा, तर पारंपरिक विद्याशाखांच्या महाविद्यालयांनी आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांची सुरुवात केली आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या कौशल्याला बळ मिळत आहे.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यापीठाबरोबरच महाविद्यालयीन पातळीवरील संशोधनाला चालना दिली जात आहे. विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या अधिकतर महाविद्यालयांनी त्यांच्या प्रयोगशाळा अद्ययावत केल्या आहेत. बदलणाऱ्या औद्योगिक आणि आर्थिक परिस्थितीत महाविद्यालयांत इन्क्युबेशन सेंटरच्या संकल्पना प्रत्यक्षात साकारली आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात दीड वर्षापूर्वी महाविद्यालयीन पातळीवरील इन्क्युबेशन सेंटरची संख्या आठ होती. मात्र, विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे मार्गदर्शन आणि प्रयत्नातून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात वर्षभरात १३६ महाविद्यालयांत इनोव्हेशन अँड स्टार्टअप सेलची सुरुवात झाली आहे.

या महाविद्यालयांतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देणारे, स्टार्टअप्सना मूळ स्वरूप देण्याच्या दृष्टीने 'इनोव्हेशन सेल' महत्त्वपूर्ण भूमिका बजावित आहेत. तज्ज्ञांची व्याख्याने, परिषद, परिसंवाद, आविष्कार संशोधन स्पर्धा, महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीचे उपक्रम राबविले जातात. त्याचे चांगला परिणाम झाला असून विद्यापीठाच्या नवोपक्रम मंडळाकडे वर्षभरात १०१ स्टार्टअपची नोंदणी झाली आहे. त्यातून विद्यार्थ्यांनी बायोफर्टिलायझर, दुधातील भेसळ रोखण्यासाठीचे सेन्सर यासह फिनटेक, एज्युटेक आदींच्या नवसंशोधनातील स्टार्टअपचा समावेश आहे.

> महाविद्यालय पातळीवरील संशोधन कामगिरी यापूर्वी संशोधन, शोधनिबंध, पेटंट यापुरती मर्यादित राहत होती. मात्र, तेथील विद्यार्थी, शिक्षकांत संशोधन वृत्ती वाढावी. त्यांच्या नवसंकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पाठबळ दिले. त्याचे सकारात्मक परिणाम झाले असून महाविद्यालयांतील संशोधनाचा टक्का वाढला आहे.
>
> **- डॉ. एस. डी. डेळेकर,**
> संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ शिवाजी विद्यापीठ

### विद्यापीठ कार्यक्षेत्रातील 'इनोव्हेशन सेल'ची संख्या

- विद्यापीठातील अधिविभाग .................... ३०
- कोल्हापूर जिल्हा .................... ६५
- सांगली जिल्हा .................... ४०
- सातारा जिल्हा .................... ३१
- विद्यापीठात नोंद झालेले स्टार्टअप .......... १०१

### विद्यार्थी, शिक्षकांना दिला ४० लाखांचा निधी

विद्यापीठाच्या नवसंशोधन मंडळाने पोस्ट डॉक संशोधन योजनेतून स्टार्टअपला चालना दिली आहे. या मंडळाने दोन वर्षांत बीजभांडवलाच्या स्वरूपात विद्यापीठ कॅम्पसमधील १५ शिक्षक, विद्यार्थ्यांना नवसंकल्पना स्टार्टअपच्या स्वरूपात आणण्यासाठी एकत्रितपणे सुमारे ४० लाखांचा निधी दिला आहे. ही योजना आता महाविद्यालयीन पातळीवर राबविण्याचा विचार या मंडळाने केला आहे.

### नवसंकल्पनांना संधी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देण्याची संकल्पना मांडली आहे. त्यात संशोधनाला महत्त्व आहे. महाविद्यालयांनी त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मंजिरी मोरे यांनी सांगितले. इन्क्युबेशन सेंटरमुळे विद्यार्थ्यांमधील स्टार्टअपच्या विकासासाठी चालना मिळत आहे. वेगवेगळ्या नवसंकल्पनांवर कोल्हापुरातील विद्यार्थी काम करत असल्याचे साळोखेनगर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील कोल्हापूर इन्क्युबेशन सेंटरचे समन्वयक डॉ. राजन डांगे यांनी सांगितले. (समाप्त)

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील ७०३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२५ या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक २ एप्रिल २०२५ पासून सुरळीत सुरू झाल्या आहेत. याअंतर्गत २ जुलैअखेर विद्यापीठाकडून एकूण ७०३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

या अभ्यासक्रमांमध्ये एम.ए. मास कम्युनिकेशन, बी.सी.ए., बी.एस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.टेक., पी.जी. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, हेल्थ अँड एन्व्हायर्न्मेंट, तसेच एम.ए. इतिहास या अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने देण्यात आली.

परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या सूचनांचे पालन करत परीक्षेत सहभाग घ्यावा, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठाकडून ७०३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचे निकाल जाहीर केले जात आहेत. आजवर परीक्षा विभागाकडून एकूण ७०३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, तर बुधवारी १३ अभ्यासक्रमांचे लावण्यात आले आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ७०३ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. बुधवारी एम.ए.मास कम्युनिकेशन, बीसीए, बीएस्सी फुड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी,, एम. टेक, पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी, हेल्थ ॲण्ड एनव्हायरमेंटल, एमए, इतिहास अशा १३ अभ्यासक्रमांची परीक्षा झाली. तर आतापर्यंत विद्यापीठ अंतर्गत झालेल्या ७०३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी जाहिर केली आहे.